कल्याण गायन समाज

दिनकर संगीत विद्यालय व म्हैसकर कला अध्यासन
यांच्या सहयोगाने आयोजित

शास्त्रिय गायन स्पर्धा २०२६-२०२७

-नियम व अटी-

१. ही स्पर्धा १६ ते ४५ वर्ष वयोगटातील स्त्री-पुरुषांकरिता खुली राहील.

२. स्पर्धेसाठी प्रवेश मर्यादित आहे.

३. आकाशवाणीवर नियमित गाणाऱ्या व व्यावसायिक गायकांना या स्पर्धेत भाग घेता येणार नाही.

४. या स्पर्धेकरिता प्रवेश शुल्क रु. २००/- निर्धारित करण्यात आले आहे. गायन समाजाच्या पेमेंट साठी सोबत QR कोड दिला आहे. पेमेंट करताना आपले नाव नमूद करणे.

५. स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्पर्धकाचे आपल्या गुरूकडे अथवा संगीत विद्यालयात किमान ५ वर्षे शिक्षण झालेले असावे.

६. एखाद्या स्पर्धकाचे सादरीकरण स्पर्धेच्या दर्जाला साजेसे नसल्यास त्यांना मध्येच थांबविण्याचा पूर्ण अधिकार सन्माननीय परिक्षकांना देण्यात आलेला आहे.

७. परिक्षकांनी दिलेला निकाल हा स्पर्धकांना बंधनकारक असेल.

८. प्रवेश अर्ज देण्याची अंतीम तारिख दि. ०५ जानेवारी २०२७ आहे.

९. स्पर्धा दोन फेरी मध्ये घेण्यात येतील, प्रथम फेरी ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येइल. स्पर्धकाने आपला राग गायनाचा विडिओ स्पर्धेसाठी तयार करावा ह्यात कोणताही राग विलंबित व द्रुत १५ मिनिटे सादर करावा स्पर्धकाने शक्यतो लाईव्ह तबला वापरावा. ऑडिओ क्वॉलिटी क्लिअर असावी. हा व्हिडिओ ५ जानेवारी २०२७ पर्यंत पाठवावा. विडिओ करताना सुरुवातीला आपले नाव व रागाचे नाव सांगावे, तसेच विडिओ फाईल सेव्ह करताना पहिले नाव नंतर

Public

आडनांव असे करावे. आपला विडिओ google drive वर अपलोड करावा त्याची लिंक कल्याण गायन समाजाच्या ई-मेल वर पाठवावी.

e mail - kalyangayansamaj@gmail.com

अंतिम फेरीसाठी स्पर्धकांची निवड २० जानेवारी २०२५ ला लागेल, १०/१२ स्पर्धक निवडले जातील.

१०. आवेदन पत्र अपूर्ण भरल्यास स्विकारले जाणार नाही.

११. कोणताही अर्ज स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार स्पर्धा समितीस राहील.

१२. स्पर्धेला किमान १५ स्पर्धकांचे अर्ज आले तरच स्पर्धा होईल.

१३. अंतिम फेरीसाठी स्पर्धकांनी दिलेल्या वेळेच्या आगोदर अर्धा तास उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

१४. स्पर्धकांना कोणत्याही प्रकारचा प्रवास व इतर खर्च दिला जाणार नाही.

१४. **शास्त्रीय गायनाच्या स्पर्धकांनी सादरीकरण करण्यासाठी -**

- **६ रागांची निवड करायची आहे.**
- **सर्व प्रहरातील रागांची निवड अपेक्षित आहे.**
- **स्वतःच्या पसंतीचा एक राग विलंबित व द्रुत बंदिशिसह १५ मिनिटे गावा लागेल.**
- **उरलेल्या ५ रागांपैकी परीक्षक आयत्या वेळी सांगतील तो राग ५ मिनिटे गावा लागेल.**

१५. संस्थेतर्फे स्पर्धकाला तबला व हार्मोनियम साथिदार उपलब्ध करून देण्यात येतील, स्वतःचे साथीदार आणल्यास त्यांची साथ गाण्याला पूरक असावी सूचक नसावी.

१६. स्पर्धकांना स्वरमंडल घेता येणार नाही (इलेक्टॉनिक तानपुरा वापरता येईल).

१७. स्पर्धेसंदर्भात कोणतेही बदल करण्याचा हक्क स्पर्धा संयोजन समिति स्वतःकडे राखून ठेवत आहे.

१८. स्पर्धेचे प्रवेश अर्ज कल्याण गायन समाजाच्या साईटवर उपलब्ध आहेत.

Public

website : www.kalyangayansamaj.com

Scan & Pay

QR Code : Kalyan Gayan Samaj

स्पर्धेची तारीख - रविवार ३१ जानेवारी २०२७

पारितोषिके -

प्रथम क्रमांक रु. १००००/-

द्‌वितीय क्रमांक रु. ६०००/-

तृतीय क्रमांक रु. ४०००/-

उत्तेजनार्थ रु. १०००/-

संस्थेचा पता -

कल्याण गायन समाज
टिळक चौक,
कल्याण पश्चिम ४२१३०१

अधिक माहितीकरिता संपर्क क्रमांक -

श्री. दिपक घारपुरे ९९८७५९१०४७

श्री. कौस्तुभ आपटे ८१४९९८१९६९

Public